# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७

आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/२२/१००१
दिनांक – ३०/८/२०११

प्रति,
मा. प्राचार्य / मा.संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय – महाविद्यालये/संस्थेमधील शिक्षक पदे भरताना तपासून द्यावयाच्या आरक्षण प्रमाणपत्राबाबत शैक्षणिक वर्ष २०११–२०१२.

संदर्भ – या कार्यालयाचे परिपत्रक क्र.आरक्षण/२२/२८२, दि. ३/३/२०११

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालये/संस्थेमधील शिक्षक पदांच्या भरती प्रक्रियेसाठी जाहिरात प्रसिध्द करणे, त्यामध्ये शासन आदेशानुसार आरक्षण ठेवणे बंधनकारक आहे.शैक्षणिक वर्ष २०११–२०१२ करीता सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्थेतील रिक्त पदांची बिंदूनामावली व आरक्षण प्रमाणपत्र तपासून देण्याची कार्यवाही पुणे विद्यापीठ आरक्षण कक्षाकडून दि. १ मार्च २०११ ते दि.३१ जुलै, २०११ या कालावधीत करण्यात आलेली आहे.

ज्या महाविद्यालये/संस्थांनी अद्यापही रिक्त पदांची बिंदूनामावली तपासून घेतलेली नाही अशा महाविद्यालये/संस्थांची रिक्त पदांची बिंदूनामावली व आरक्षण प्रमाणपत्र तपासून देण्याची कार्यवाही पुणे विद्यापीठ आरक्षण कक्षाकडून दि. २ सप्टेंबर २०११ ते ३० सप्टेंबर २०११ या कालावधीत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्या महाविद्यालये/संस्थेतील सर्व पदे भरण्यात आलेली आहेत अशा महाविद्यालये/संस्थांनी बिंदूनामावली अद्ययावत करुन या कार्यालयाकडून प्रमाणित करुन घ्यावी.

बिंदूनामावली तपासून घेण्यासाठी आवश्यक असणारी माहिती प्रपत्रासह या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय परिपत्रकासोबत जोडलेली असून सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (रिझर्व्हेशन सेल) उपलब्ध आहे.

बिंदूनामावली तपासणीसाठी मागितलेली माहिती सादर केल्याशिवाय बिंदूनामावली तपासून दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)